**BHARATI VIDYAPEETH'S**

**INSTITUTE OF PHARMACY, ERANDWANE, PUNE-411038**

Alumni Meet

Alumni Meet conducted on 26th February 2023. Chief Guest was Mr. Shyam Pratapwar, Joint Commissioner, FDA, Pune.






Bharati Vidyapeeth's
f Pharmacy Alumni Association
Erandwane, Pune
mni Meet
at 4 pm
Dr.H.M. Kadam
Chairman




Institute
Alumni
Sunday, 26 th February
Kumbhar
Prasanna
President
PHARMACIST RECRUITMENT EXAM

# 'भारती'च्या माजी विद्यार्थी संघटनेचा मेळावा

पुणे : भारती विद्यापीठ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी ॲल्युम्नी असोसिएशनतर्फे माजी विद्यार्थी संघटनेचा स्नेहमेळावा उत्साहात पार पडला. याचे उद्घाटन अन्न व औषध प्रशासनाच्या पुणे विभागाचे सहआयुक्त श्याम प्रतापवार यांच्या हस्ते झाले. संघटनेचे अध्यक्ष प्रसन्न पाटील या वेळी उपस्थित होते. उपप्राचार्य पोपट जाधव यांचा फार्मसी क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. या निमित्ताने प्रा. प्रवीण जावडे व प्रा. सुनील बाकलीवाल लिखित 'फार्मसी रिक्रुटमेंट एक्झाम' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच, एकपात्री कलाकार मकरंद टिल्लू यांच्या 'जगण्यासाठी हसा आणि हसण्यासाठी जगा' या कार्यक्रमाचे सादरीकरण झाले. या वेळी प्रा. डॉ. एच. एम. कदम, डॉ. बी. एस. कुचेकर, डॉ. ए. व्ही. यादव, डॉ. विलासराव कदम, डॉ. एच. एन मोरे आदी उपस्थित होते.

- **भारती विद्यापीठ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी माजी विद्यार्थी संघटना :** माजी विद्यार्थी मेळावा, प्रमुख पाहुणे : कुंदनमल दर्डा, श्याम प्रतापवार, डॉ. एच. एम. कदम, प्रा. पी. ए. जाधव, प्रसन्न पाटील, डॉ. अशोक कुमार, स्थळ : भारती विद्यापीठ लॉ कॉलेज सभागृह, एरंडवणे : दुपारी ४ वा.

नचालकानाही त्रास सहन करावा
। प्रश्न पुणेकर विचारत आहेत.

महाविकास आघाडीला विजय ... अशी ग्वाही अभिनव या
मिळण्यात त्यांच्या योगदानाची ... दिली.

# भारती विद्यापीठ फार्मसीच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १० -** भारती विद्यापीठ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी अॅल्युमिनी असोसिएशन, पुणे या माजी विद्यार्थी संघटनेचा मेळावा उत्साहात पार पडला. मेळाव्याचे उद्घाटन अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहआयुक्त शाम प्रतापवार यांच्या हस्ते झाले. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन आठवणींना उजाळा दिला.

संघटनेचे अध्यक्ष प्रसन्न पाटील यांनी समाजोपयोगी व विद्यार्थी केंद्रीत उपक्रमाची माहिती दिली. प्रसिद्ध उद्योजक अतुल शहा त्यांच्या वडिलांच्या स्मृतीप्रित्यर्थ दोन गुणवंत गरीब विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांकरीता प्रत्येकी २५ हजार रुपयांचा, तर युनिटी मेडिकेअरचे संचालक सागर पायगुडे यांनी दहा हजारांचा धनादेश महाविद्यालयाकडे सुपूर्द केला. उपप्राचार्य पोपट जाधव यांच्या फार्मसी क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल सत्कार करण्यात आला. याप्रसंगी 'फार्मसिस्ट रिक्रुटमेंट एक्झाम' या प्रा. प्रवीण जावडे व प्रा. सुनील बाकलीवाल लिखित पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच एकपात्री कलाकार मकरंद टिल्लू यांचा 'जगण्यासाठी हसा आणि हसण्यासाठी जगा' या कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी डॉ. एच. एम. कदम, डॉ. बी. एस. कुचेकर, डॉ. ए. व्ही. यादव, डॉ. विलासराव कदम, डॉ. एच. एन. मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन नितीन देव यांनी केले व आभार रितेश ओसवाल यांनी आभार मानले.

## 'वॉकेथॉन'

## मनपा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची